महासागर
अमरावती
पान 3
सोमवार दि. 23 सप्टेंबर 2024

# छत्री तलावात उडी घेऊन वृद्ध आईसह मुलाची आत्महत्या

## आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाने मृतदेह काढले बाहेर



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - शहरातील छत्री तलावात सकाळी फेरफटका मारण्यासाठी गेलेल्या काही नागरिकांना तलावात महिलेचा मृतदेह आढळून आला. ही माहिती तत्काळ राजापेठ पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या चमुला पाठवून वृद्ध महिलेचा मृतदेह बाहेर काढला. परंतू त्यानंतर त्या महिलेच्या मुलाचाही मृतदेह पाण्यात आढळून आला. त्यामुळे आई व मुलाने तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. ही घटना रविवारी 22 सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. लक्ष्मी मनोहर लोणकर (80) व लक्ष्मण मनोहर लोणकर (55, दोघेही रा. दस्तूरनगर) अशी मृतांची नावे आहे.

### मोबाईलमध्ये पासवर्ड ठेवण्यावरून झाला वाद

21 सप्टेंबरच्या रात्री मोबाईलमध्ये पासवर्ड ठेवण्यावरून घरात वाद झाला. ज्यामध्ये लक्ष्मण आणि त्यांच्या पत्नीने एकमेकांना शिवीगाळ केली. त्यानंतर लक्ष्मण त्याच्या आईकडे गेला आणि तिच्याशी बोलला. त्यानंतर ते त्याला अल्टो वाहन क्रमांक एमएच 27/3156 मध्ये घेऊन गेले. लक्ष्मणच्या मुलाने व पत्नीला वाटले की तो कोणत्यातरी नातेवाईकाच्या घरी गेला असावा. मात्र 22 सप्टेंबर रोजी सकाळी छत्री तलावात आजी व वडिलांचे मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. अशी माहिती लक्ष्मण यांचा मुलगा पार्थ लोणकर याने राजापेठ पोलीस ठाण्यात दिली. याप्रकरणात पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

### लक्ष्मण विद्यापीठात होते कार्यरत

मृतक लक्ष्मण लोणकर हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गोपनीय विभागात वरिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत होते. मात्र दोन्ही आई-मुलांनी छत्री तलावात आत्महत्या का केली ही बाब पुढे आली नव्हती. दरम्यान लक्ष्मण यांची कार छत्री तलावजवळील परिसरात पोलिसांना दिली. त्यावेळी पोलिसांनी कारची पाहणी केली असता, त्यात लक्ष्मण यांनी लिहिलेली सुसाईट नोट मिळून आली. ज्यामध्ये आम्ही स्वत:च्या इच्छेने आत्महत्या करत असल्याचे लिहिले आहे, अशी माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली आहे.

### अल्टो वाहनाने गेले होते छत्री तलावावर

फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील दस्तूर नगर येथील रहिवासी लक्ष्मण लोणकर आणि त्याची आई लक्ष्मी हे अल्टो कारमधून छत्री तलाव येथे गेले आणि त्यांनी पाण्यात उडी घेऊन आतमहत्या केली. ही बाब सकाळी नऊच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत नागरिकांनी तात्काळ राजापेठ पोलिसांना माहिती दिली. राजापेठ पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. याची माहिती तातडीने डीडीआरएफ टीमला देण्यात आली. मात्र अनेक तास डीडीआरएफची टीम घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला होता. काही वेळाने डीडीआरएफची टीम तलावाच्या परिसरात पोहोचली. जिथे 12 वाजताच्या सुमारास लक्ष्मी लोणकर यांचा मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. यानंतर लक्ष्मण लोणकर यांच्या मृतदेहही हाती लागला.

# आज विदर्भाच्या राजाची विसर्जन मिरवणूक

## थाटात निघणार शोभायात्रा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - शहरातील खापर्डे बगीचा स्थित न्यु आझाद गणेश उत्सव मंडळाचा विदर्श राजा विसर्जनसाठी निघणार आहे. दरवर्षीप्रमाणे विसर्जन मिरवणुक मोठ्या थाटात भव्यदिव्य स्वरुपात 23 सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास निघणार असुन हा विसर्जन कार्यक्रम रात्री 10 वाजतापर्यंत चालणार आहे.

विदर्भ राजाच्या या विसर्जन मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात भजनी मंडळ, ढोल ताशे पथक तसेच हजारोच्या संख्येने भाविक सहभागी होतात. विसर्जन मिरवणुक मार्ग खापर्डे, बगीचा - इर्विन चौक, मर्चुरी टी पॉईन्ट, रेल्वे स्टेशन चौक, रेल्वे ओव्हरब्रिज, राजकमल चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, दिपक चौक, चौधरी चौक, मोसिकॉल जीन असा आहे. विसर्जन मिरवणुकीत भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारीची उपाययोजना म्हणुन पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी 20 सप्टेंबर रोजी तात्पुरती अधिसूचना काढली असून, विसर्जन मिरवणुक मार्गावर मिरवणुकीची रुपरेषा बघुन वाहतुक नियमनाकरिता सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक वळविण्यात येणार आहे. या अनुषंगाने मिरवणुक मार्गावरिल सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदीचे आदेश निर्गमीत केले आहे.

न्यु आझाद गणेश मंडळाची गणपती विसर्जन मिरवणुक खापर्डे बगीचा येथुन सुरु होवुन मिरवणुक इर्विन चौकात आल्यानंतर गर्ल्स हायस्कुल चौककडुन इर्विन चौकाकडे येणारी वाहतुक पोलीस पेट्रोल पंप मार्गे बस स्टॅंडकडुन व बाबा कॉर्नरकडुन इर्विन चौकाकडे येणारी वाहतुक लेखुमल चौकाकडे वळविण्यात येईल. विसर्जन मिरवणुक मर्च्युरी टी पॉइंट ते रेल्वे स्टेशन मार्गावार असतांना रेल्वे स्टेशन चौकाकडुन येणार व मर्च्युरी टी पॉइंटकडुन रेल्वेस्टेशनकडे जाणारी वाहतुक एकतर्फी मार्गाने सुरु राहील. सदर मिरवणुक रेल्वे स्टेशन चौक ते रेल्वे ब्रिजवर आल्यानंतर एस टी स्टॅंड कडुन येणारी वाहतुक उस्मानिया मस्जिद ते खापर्डे बगीचा मार्गाने वळविण्यात येत आहे तसेच रुख्मीणी नगर कडुन हमालपुरा रोडने रेल्वे ब्रिजवर येणारी वाहतुक श्याम नगर चौक ते पोलीस पेट्रोल पंप मार्गाने वळविण्यात येईल.

### आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर होईल कारवाई

सदर आदेश/अधिसुचनेचे जो कोणी वाहनचालक उल्लंघन करेल, त्यांच्याविरुध्द मोटार वाहन कायदा 1988 व महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. पोलीस विभागाकडुन सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आदेशात नमुद कालावधीत घातलेल्या निर्बंधाचे काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागास आवश्यक सहकार्य करावे.

## दक्षिण झोन कार्यालयात आरआरआर सेंटर कार्यान्वित

**अमरावती** - महापालिका आयुक्त, उपायुक्त, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता), साहाय्यक आयुक्त झोन क्र. 4 यांच्या निर्देशानुसार स्वच्छता ही सेवा 2024 निमित्त दक्षिण झोन क्रमांक 4 बडनेरा कार्यालय येथे आरआरआर अर्थात रिडीस, रियुज रिसायकल सेंटरची स्थापना करण्यात आली. या सेंटरचे उद्घाटन साहाय्यक आयुक्त झोन क्र. 4 बडनेरा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्षेत्रीय अधिकारी, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाने, स्वास्थ निरीक्षक वैभव खरड, मेघराज ढेनवाल, संजय माहुलकर, प्रियंका बैस, सागर राजुरकर व मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# प्रविणनगर परिसरात आढळले तीन वाहनांवर रक्तासारखे डाग

**घातपाताचा संशय ■ गाडगेनगर पोलिसांना केले पाचारण**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** - प्रवीण नगर परिसरातील एका गॅरेजच्या बाजुला उभ्या असणार्या तीन कारवर रक्तांसारखे डाग असल्याचे आढळून आल्याने रविवारी दुपारी खळबळ उडाली होती. या वाहनांना पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमल्याने वाहतुक ठप्प झाली. याबाबतच्या माहितीवरून गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळ गाठले व वाहनावर असलेल्या डागांचे नमुने घेतले आणि ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले. या वाहनांवर ते डाग कसे आले. ही बाब अद्याप स्पष्ट झाली नसून, पोलिस वाहनांच्या क्रमांकावरून मालकांचा शोध घेत आहे.

प्रवीण नगर रोडवरील एका गॅरेजजवळ गेल्या काही दिवसांपासून तीन कार उभ्या आहेत. परंतू रविवारी दुपारी परिसरातील नागरिक ये-जा करीत असताना, त्यांना या वाहनांवर रक्ताचा सडाच असल्याचे दिसून आले. ते डाग हे रक्तासारखेच होते. त्यामुळे काही तरी वेगळा प्रकार घडल्याचा संशय नागरिकांना आला. त्यामुळे काही नागरिकांनी या घटनेची माहिती गाडगेनगर पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून चौकशी सुरु केली. पोलिसांनी तेथील रक्तासारखे डागाचे नमुने घेऊन फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवले. या घटनेमुळे घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी झाली होती.

# नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.22 )** - तालुक्यातील माऊली धांडे येथीलअल्पभूधारक युवा शेतकर्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना 22 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. दामोदर बळीराम तायडे (24, रा. माऊली धांडे) असे मृताचे नाव आहे. नापिकी व कर्जाला कंटाळून त्यांनी हे आत्महत्येचे पाऊल उचल्याची चर्चा आहे. दामोदर तायडे याच्या घरी दोन एकर शेत होते. त्याला आई-वडील तसेच एक विवाहित बहीण असून मागील काही दिवसांपासून घर बांधकाम सुरू होते. घर स्लॅब लेवल आले असता स्लॅप टाकण्यासाठी पैसे नव्हते. काही दिवसापासून घरकुलाची पैसे आले नाहीत, या सर्व बाबींना कंटाळून दामोदर बळीराम तायडे याने विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. आठ दिवसात कर्जापायी माऊली धांडे येथील ही युवा शेतकऱ्याची दुसरी आत्महत्या आहे.

# शेतकऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव पेठ,( दि.22 )**- छातीत दुखत असल्याने मार्डी रोड स्थित संत अच्युत महाराज रुग्णालयात दाखल झालेल्या शेतकऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवार दि.18 सप्टेंबर रोजी घडली. विनोद समाधानराव भगत (52) असे त्या शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. घटनेच्या एक दिवसाआधी विनोद भगत यांच्या छातीत दुखत असल्याने त्यांनी खासगी रुग्णालयात तपासणी केली.त्यानंतर ते संत अच्युत महाराज रुग्णालयात एंजिओप्लास्टीसाठी दाखल झाले.एंजिओप्लास्टी यशस्वी झाल्यानंतर अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय चमुने शर्थीचे प्रयत्न करून देखील त्यांचे प्राण वाचविण्यात ते अयशस्वी ठरले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, एक मुलगा, मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. बुधवारी स्थानिक हिंदू स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले.



# गणेशोत्सवाच्या नावाखाली विद्यार्थी नंगानाच करतात?

## व्हीएमव्हीतील प्रबंधकांनी घेतले तोंडसूख ■ विद्यार्थ्यांची संचालकांना तक्रार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.22 )**- गणेशोत्सवाच्या नावाखाली विद्यार्थी नंगानाच करित असल्याचे तोंडसुख व्हिएमव्हीतील प्रबंधकांनी घेतले असल्याचा आरोप येथील विद्यार्थ्यांनी केला आहे. गणेश विसर्जनादरम्यान डिजे वाजविण्याची परवानगी मागण्याकरिता गेलेल्या विद्यार्थ्यांकरिता ही भाषा वापरुन त्यांनी विद्यार्थ्यांना आल्या पावली माघारी पाठविले. याप्रकरणी व्हीएमव्हीतील प्रबंधकांची संचालकांना तक्रार करण्यात आली आहे. प्रबंधकांना डिजेची बाधा होत होती की, गणेशोत्सवाची ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शिस्तीच्या नावाखाली प्रबंधक दडपशाही करत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. या प्रकाराची तक्रार संचालकांकडे 19 सप्टेंबर रोजी करण्यात आली. या तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या संचालकांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

अमरावती येथील शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील प्रबंधकाच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी संचालकांकडे ही तक्रार केली आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारीनुसार, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून या संस्थेत वेगवेगळे कार्यक्रम सर्व धर्म समभाव हे उद्दिष्टे समोर ठेवून विद्यार्थी साजरे करतात. त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा सर्व विद्यार्थी मिळून संस्थेमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यासाठी एकत्रित जमले होते. मात्र गणेशोत्सवाच्या मिरवणुकीसाठी साऊंड सिस्टिमची परवानगी मागण्यासाठी गेल्यावर प्रबंधकाद्वारे गणेशोत्सवाचे मिरवणुकीला अपशब्दाचा वापरण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत व यापूर्वी सुद्धा विद्यार्थ्यांद्वारे प्रबंधकाबद्दल विविध तक्रार सादर केल्या गेल्या आहेत. परंतु त्या तक्रारींवर अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही केल्या गेली नाही. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेता प्रबंधकाला निलंबित करण्यात यावे, अन्यथा आमरण उपोषणाची परवानगी द्यावी, अशी भुमिका विद्यार्थी घेणार आहेत. या तक्रारीची प्रतिलिपी विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च शिक्षण विभाग प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, खासदार बळवंतराव वानखडे, खासदार अनिल बोंडे, आमदार बच्चु कडू व आमदार रवी राणा यांना सुध्दा पाठविली आहे.

> विद्यार्थ्यांची तक्रार आली आहे. परंतु ती खरी आहे की खोटी हे तपासावे लागेल. याबाबत चौकशी करण्यात येईल. चौकशीनंतर पुढील कार्यवाहीची दिशा ठरेल.
>
> **सुबोध भांडारकर, संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था**

> गणेशोत्सवानिमीत्त सुट्टी नव्हती. विद्यार्थ्यांचे वर्ग सुरु होते. त्यामुळे साऊन्ड सिस्टीम वाजविण्यासाठी परवानगी देण्यात आली नाही. अन्यथा वर्गातील विद्यार्थ्यांना साऊन्ड सीस्टीमच्या आवाजाचा त्रास झाला असता. मी परवानगीच्या अनुषंगाने कोणताही अपशब्द वापरलेला नाही. काही विद्यार्थ्यांच्या नियमबाह्य कामांना ब्रेक लागला असावा, त्यामुळे ते आरोप करीत आहेत. माझ्याकडे एकही विद्यार्थी आला नाही. 2 प्राध्यापक व एक माजी विद्यार्थी आले होते. अन्य विद्यार्थी बाहेरच होते.
>
> **विलासराव मानकर, प्रबंधक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था**



> शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या बऱ्याच तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याची रितसर तक्रार पहिलेच मुख्यमंत्री व पालकमंत्री महोदयांकडे केली असून, प्रबंधक मानकर यांना बडतर्फ करावे ही भूमिका आमची असेल. शिस्तीच्या नावाखाली धार्मिक भावनांची दडपशाही खपवून घेतली जाणार नाही. प्रबंधक मानकर यांनी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी अन्यथा शिवसेना स्टाईल ने आंदोलन करण्याची वेळ संचालकांनी आमच्यावर आणू नये.
>
> **आशिष ठाकरे, शिवसेना ( शिंदे गट ) शहर प्रमुख, अमरावती.**

# एलसीबीची परतवाडा हद्दीत कारवाई!

## ■ठाणेदारच नाही, नोटीस कुणाला बजाविणार ?




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.22 )**- पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांवर अंकुश रहावा यासाठी पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षकांसह पोलीस कर्मचारी काम करतात. मात्र त्यांचे याकडे दुर्लक्ष होत असेल तर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई झाल्यानंतर संबंधित ठाणेदारांना वरिष्ठांकडून कारणे दाखवा नोटीस दिली जाते. गेल्या आठवड्यात एलसीबीने परतवाडा ठाण्याच्या हद्दीत कारवाई केली. परंतू या ठिकाणी गेल्या काही महिन्यांपासून ठाणेदारच नसल्याने आता ठाणेदारांच्या खुर्चीला नोटीस बजाविण्यात येईल का? असे चर्चा चर्वण ग्रामीण पोलीस विभागात सुरु आहे.

परतवाडा पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या आठवड्यात स्थानिक गुन्हे शाखेने जवळपास दोन लाखाचा प्रतिबंधक गुटखा आणि सोबत इतर असा सहा लाखांच्या वर मुद्देमाल जप्त करून कारवाई केली. इतक्या मोठ्याप्रमाणात गुटखा तस्करीची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला असावी, परंतू परतवाडा पोलिसांना याची चूणूकही नसावी ? हा प्रकार पचन्यासारखा नाही.

परतवाडा पोलीस स्टेशन हद्दीत याआधी असलेले पोलीस निरीक्षकांली अनेक कारवाया केल्या मात्र प्रभारी ठाणेदार असल्याने आता कारवाईचा वेग मंदावला आहे. परतवाडा ठाणा हद्दीत सागवान तस्करी, वरली मटका, अवैध गोवंश तस्करी, आर्म ॲक्टअंतर्गत कारवाई तत्कालीन पोलीस निरीक्षकांनी केली.

मात्र काही दिवसातून या कारवाई थांबल्याने परतवाड्यातील सर्व अवैध धंदे बंद झाले का अशी चर्चा आहे. परतवाडाच नव्हे तर जिल्ह्यातील सर्वच पोलीस स्टेशन हद्दीत हाच प्रकार आहे. स्थानिक गुन्हे शाखेने पोलीस स्टेशन हद्दीत केलेल्या कारवाईनंतर आता वरिष्ठाकडून प्रभारी यांना नोटीस कोणाला हा प्रश्न सध्या तरी चर्चेत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार दिनांक 16 सप्टेंबरला ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी अचलपूर पोलीस स्टेशन सह परतवाडा स्टेशनला भेट दिली.आताचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हे परतवाडा पोलीस स्टेशन ठाणेदार म्हणून काम केल्याने त्यांना या ठिकाणची अवैध धंदे आणि धंदे वाल्याची बरीच माहिती आहे.त्यामुळे आता परतवाडा पोलीस स्टेशन हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाई नियमित राहील यात काही शंका नाही.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जारीद्याला आश्रमशाळा आहे की, बेशरम शाळा!

## वारंवार वृत्त प्रकाशित करुनही सुधारणा नाहीच | विद्यार्थ्यांच्या असुविधेवर सर्वांची चुप्पी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.22 )** – शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणाच्या गर्तेत असलेल्या मेळघाटात शिक्षणाची गंगा वाहावी या उद्देशाने शासनाने आदीवासी विद्यार्थ्यांना सर्व सुविधांसह शिक्षण देण्याकरिता आश्रमशाळांची उभारणी केली. परंतू जबाबदार मुख्याध्यापकांनी येथील कोट्यवधी रुपयांच्या सुविधांना मोडीत काढल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना येथे शिक्षण घेणेच कठीण होत आहे. जारीदा येथील आश्रमशाळा यामध्ये अग्रस्थानी आहे. येथील असुविधेचे 'दै.महासागर' ने वारंवार वृत्त प्रकाशित करुनही प्रकल्प कार्यालयाकडून कुठलीच कार्यवाही झाली नाही आणि आश्रमशाळा प्रशासन सुधारण्याचे नाव घेत नाही, ही 'आश्रमशाळा' नसून, 'बेशरम' शाळा आहे, असे वाटायला लागले आहे.

मेळघाटातील सर्वात मोठी असलेली जारीदा आश्रमशाळेत जवळपास 1 हजार आदीवासी मुलं आणि मुली शिक्षण घेतात. मुंबई आणि इतर ठिकाणच्या महिला अत्याचाराच्या घटना समोर आल्यानंतर राज्य शासनाने सर्व शाळांमध्ये विशेषतः ज्या ठिकाणी मुली शिक्षण घेतात अश्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश दिले आहे. असे असताना अति संवेदनशील असलेल्या जारीदा आश्रमशाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नाहीत, विशेषतः मुलींच्या वसतीगृहातही अजूनही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नाही. मुलींच्या वसतीगृहाच्या खिडक्या तुटलेल्या, तावदाने फुटलेली आहेत. ज्यामुळे एखादी अप्रिय घटना घडण्याची वाट येथील मुख्याध्यापक पाहताहेत का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणत्याही प्रकारचा आड पडदा किंवा आडोसा मुलींसाठी नाही. या सर्व बाबींवरून या वसतीगृहात मुलींच्या सुरक्षेचे तीन-तेरा वाजलेले दिसून येत आहे. साधी पंख्याची सोयही येथे करण्यात आली नाही. येथील मुलं, मुलींना वसतीगृहात 12 महिने आणि 24 तास पंख्याविना रहावे लागते.







| बंद असलेल्या सुविधा | विद्यार्थ्यांची असुविधा |
|---|---|
| सोलर वॉटर हीटर सुरुच केले नाही | 12 ही महिने तलावावर अंघोळ |
| जल शुध्दीकरण यंत्र धुळखात | सार्वजनिक विहीरीमधून दुषीत पाणी पुरवठा |
| शौचालयांना लावले कुलूप | प्रात: विधी करावा लागतो उघड्यावर |
| लाईट आणि पंखे बंद | विद्यार्थ्यांना अंधारात व गर्मीत झोपावे लागते |

### एपीओ करतात तरी काय?

आदीवासी प्रकल्प कार्यालयात सहायक प्रकल्प अधिकारी (एपिओ,शिक्षण) हे पद जवाहर गाढवे नामक अधिकारी सांभाळतात. वृत्तपत्रातून छापून येणारे वृत्त किंवा लेखी तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकाराची चौकशी करण्याचे काम त्यांचे आहे, परंतू त्यांच्या टेबलावर येणाऱ्या तक्रारींना मूठमाती दिली जात असल्याची माहिती आहे. त्यामूळे आतापर्यंत आलेल्या तक्रारी आणि त्यासंबधित झालेल्या कारवाईचा अहवाल तपासल्यास गाढवेच संशयाच्या भोवऱ्यात सापडतील.

### 90 शौचालये तरी विद्यार्थ्यांचा प्रात: विधी उघड्यावर

शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरिता पुरेसे शौचालय आणि स्वच्छतागृह नसल्याची ओरड करणाऱ्या मुख्याध्यापकांना त्यांच्या शाळेत तब्बल 90 शौचालय आणि स्वच्छतागृह उपलब्ध आहे, ही माहिती नसावी, मुख्याध्यापकांच्या अनास्थेमुळे व दुर्लक्षीतपणामुळे या वास्तू अत्यंत घाणेरड्या झाल्या आहेत, ज्यामूळे परिसरात दुर्गंधी पसरलेली असते आणि अपर्यायाने विद्यार्थी उघड्यावर शौच करतात. हा प्रकार केंद्र व राज्य शासनाच्या स्वच्छता अभियानाला हरताळ फासणारा आहे, हेही तेवढेच खरे.

मी लवकरच जारीदा येथील आश्रमशाळेची पाहणी करुन तेथील परिस्थितीचा आढावा घेते.

**प्रियमवदा अ. म्हाडदळकर,**
**आदीवासी प्रकल्प अधिकारी, धारणी तथा सहायक जिल्हाधिकारी अमरावती.**





# फायर बुलेट वाहन न.प.च्या अग्निशमन दलाच्या दिमतीला

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.22 )** –अरुंद रस्त्यांमुळे गल्लीबोळात कार, दुचाकी आदी वाहनांना आग लागल्यास त्यावर त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी मोर्शी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलात फायर बुलेट वाहन दाखल झाले आहे. या फायर बुलेटमुळे नगरपरिषदेच्या अग्निशमन केंद्रांची ताकद वाढली आहे. गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर ही गाडी प्रत्यक्षात कार्यान्वित झाली आहे.

आगीसारख्या घटना घडल्यावर अग्निशमन दलाची मोठी वाहने त्या ठिकाणी लवकर जाऊ शकत नाहीत, अशा ठिकाणी फायर बुलेट जाऊन आगीवर नियंत्रण मिळवणे सोपे होणार आहे. त्यासाठी 350 सीसीच्या दुचाकी (बुलेट)वर अध्ययावत असे अग्निशमन यंत्र बसवून त्याद्वारे गल्लीबोळात लागलेल्या आगीवर या दुचाकीद्वारे नियंत्रण मिळवता येईल. त्यामुळे राज्य शासनाने राज्यातील प्रत्येक नगरपरिषदेस 24 किलो वॉटर फोम, दोन फायर सिलेंडर, फायर पंप 50 फूट, त्यावर जनरेटर सेट, ध्वनी प्रक्षेपक आणि सायरण व्यवस्था असलेली अशी अद्ययावत बुलेट दुचाकी तयार करून पाठविण्यात आली आहे. गल्लीबोळात लागणाऱ्या आगी, विद्युत ट्रान्सफॉर्मर, कार, बाईकला लागणाऱ्या आगीवर सहज नियंत्रण करता येणार आहे. या फायर बुलेट दाखल झाल्याने मोर्शी नगरपालिकेच्या अग्निशमन केंद्राची ताकद वाढली असल्याचे मत मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी व्यक्त केले आहे.

# गणेश भक्तांना फराळ वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 22 )**– तालुक्यातील नानागुरू महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिरखेड ग्रामात गणेशोत्सव निमित्ताने आयोजित विसर्जन मिरवणुकीत स्वराज फाऊंडेशन चे वतीने भाविक भक्तांना चहा व फराळ वाटप करण्यात आले.



यावेळी स्वराज फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत गोमकाळे, मंगेश खरासे, नितीन जाणे, वैभव देशमुख, प्रवीण गोमकाळे, अंकित अडोकर, मुकुंद देशमुख, जितेंद्र बांगल, स्वस्तिक शहाणे, बाबाराव देशमुख, मंगेश देशमुख, संदीप देशमुख, प्रिती गोमकाळे, रुपाली जाणे, प्रीती खरासे, स्मिता देशमुख, छाया देशमुख, भारती देशमुख, सुनीता देशमुख आदींनी परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमाचे हे सातवे वर्ष आहे. याप्रसंगी ठाणेदार सचिन लुले यांच्यासह पोलीस कर्मचारी वृंदांनी येथे भेट दिली.


# कर्मयोगी फाउंडेशनच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.22 )** – कर्मयोगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पंकज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम वाढोणा तालुका धामणगाव रेल्वे येथील पूर्व माध्यमिक मराठी शाळा वाढोणा येथे शालेय विद्यार्थ्यांना कर्मयोगी फाउंडेशन कडून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



कर्मयोगी फाउंडेशन बोलते नव्हे तर करते व्हा या तत्त्वावर कर्मयोगी फाउंडेशन गर्जवंतांना एक मदतीचा हात म्हणून कर्मयोगी फाउंडेशन ही नेहमी अग्रेसर असतात. आज 19 सप्टेंबर रोजी वाढोणा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षिका अनुजा वाळके यांचा यावेळी कर्मयोगी फाऊंडेशन कडून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच विजय पाटील, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी सरपंच मुरलीधर नारे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश गुडदे, कर्मयोगी फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष विनोद तितरे, चंद्रशेखर कडू, प्रेम वाळके, अनिल बगाडे, रुपेश तितरे, जगदीश कडकडे, यशवंत भापकर, उमेश आडे, बावणे, स्वप्निल भापकर, शिक्षिका सत्कारमूर्ती अनुजा वाळके, मुख्याध्यापिका प्रतिभा मनोहरे, मीना पाटील, ममता भावेकर, सुचिता जुनघरे, सरला लामकासे, इत्यादी शिक्षिका व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेम वाळके यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका माधवी ढाकळे यांनी केले.



# कुऱ्हा परिसरात माकडांचा धुमाकूळ

**महासागर प्रतिनिधी**


**तिवसा, ( दि.22 )**– कुऱ्हा परिसरात सद्यास माकडांनी धुमाकुळ घातला असून, माकडांमुळे गावकरी व शेतकरी त्रस्त झाले आहे. बरेच दिवसांपासून वऱ्हा, घोटा, मारडा, वंडली, छिदवाडी, कौंडण्यपूर, जहागीरपूर, बोर्डा, हसनापूर, चनुष्ठा,मसदी, अंजनवती, भिवापूर आदी गावांमध्ये माकडांचा धुमाकुळ सुरु आहे. तसेच शेतामध्ये माकडांचा भयंकर धुमाकूळ सुरू असून गावातील कवेलू व टिनपत्रे इतरही घरांवर सुध्दा माकडांचे कडळ धुमाकुळ घालून मोठ्या प्रमाणावर नुकसान करित आहे. त्यामुळे वनविभागाने माकडांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी करित आहे.

# सततच्या पावसामुळे मेळघाटातील पिके पडली पिवळी

## सोयाबीनचे उत्पादन घटणार | आदीवासी शेतकरी आर्थिक संकटात

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.22 )** – यावर्षी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सोयाबीन हे पीकाची लागवड केली. परंतु सततच्या पावसामुळे या पिकावर मोठे संकट कोसळले आहे. सध्या शेतात उभे असलेले सोयाबीन पूर्णतः पिवळे पडले आहे. त्यामुळे मेळघाटात या वर्षी सोयाबीनचे उत्पादन घटणार आहे. यामध्ये मेळघाटातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असल्याचे चिन्हे दिसत आहेत.




मेळघाट परिसर हा डोंगर उताराचा व जंगल परिसरातील शेती या भागातील आदिवासी बांधव करतात. या परिसरातील मुख्य पीक म्हणजे सोयाबीन हा आहे. सततच्या पावसामूळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे सोयाबीन पिवळे पडले आहे. या सोयाबीनला फुल आणि फळांची संख्या कमी झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व उसनवारी करून पैसे घेऊन शेतामध्ये पेरणी केली. खत फवारण्या केल्या, परंतु उत्पादन कमी होत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट उभे ठाकले आहे. त्यामूळे महाराष्ट्र शासनाने मेळघाटात दुष्काळ घोषीत करावा अन्यथा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तरी द्यावी अशी मागणी मेळघाटातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# परतीच्या पावसाने सोयाबीन झोडपले

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.22 )** – पथ्रोट येथील जवलापुर शेतीशिवारात परतीवर पावसाने सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान केले आहे. कसे-बसे थोडाफार प्रमाणात घरी येणारे सोयाबीन पीकही माती मोल झाले. त्यामुळे पुन्हा शेतकर्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. मागील दोन महिन्यापासून सुरू असलेल्या एक तर सततच्या पावसाने कपाशीसह सोयाबीनचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने उत्पादनात घट झाली.



22 सप्टेंबर रोजी दुपारी एक ते दोन वाजता दरम्यान अचानक जोरदार पावसाचे आगमन झाले. त्यामुळे जवळापुर शेत शिवारात सोगलेले सोयाबीन पाण्याखाली आले. संपूर्ण शेत शिवार जलमय झाले. सोगुन ठेवलेले सोयाबीनला कोंब फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही, तोंडाशी आलेला घास पुन्हा परतीच्या वाटेवर असलेल्या पावसाने क्षणातच हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांचा संपूर्णतः हिरमोड झाला आहे.विमल कडु, भास्कर कडु, गजेंद्र कडु, शुभम कडु, अशोक ठाकरे, गजानन रामेकर, अनिकेत कडु, अहमद अली, विनोद कडू यांच्यासह आदी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला असल्याचे सांगितले आहे. शेतकऱ्यांनी मोठे परिश्रम घेऊन सोयाबीन पीक उभे केले. अशातच परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने काहींनी उर्वरित सोयाबीन पीक कापून ठेवले. तर काही कापण्याच्या तोंडावर शेतातच उभे आहेत. मात्र या पावसाने सोयाबीन पिकाची माती झाली असे चित्र निर्माण झाले आहे.

# 33 दिवस आकाशात होणार दोन चंद्राचे दर्शन

## खगोलीय घटनेची अभ्यासकांमध्ये उत्सुकता



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 )** – अगदी चंद्रासारखा दिसणारा सूर्यमालेतील सर्वात लहान ग्रह असणारा बुध हा 19 सप्टेंबर ते 22 ऑक्टोबरपर्यंत सूर्याच्या सान्निध्यात राहणार आहे. त्यामुळे आकाशात एकावेळी दोन चंद्र पाहण्याची संधी मिळणार आहे. 4 किंवा 6 इंच टेलिस्कोपमधून हा ग्रह ठिपक्यासारखा दिसतो, त्यामुळे ही खगोलीय घटना पाहण्याची उत्सुकता खगोलीय अभ्यासकांमध्ये दिसून येत आहे.

बुध हा आंतरग्रह असल्याने नेहमीच सूर्याच्या सान्निध्यात असतो. त्यामुळे पूर्व किंवा पश्चिम क्षितिजावर फार कमी वेळ दिसते. सध्या हा ग्रह कन्या राशीत असून 19 ऑक्टोबरला तूळ राशीत असेल, त्यामुळे दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये हा ग्रह संध्याकाळी पश्चिम आकाशात दिसू शकेल. याचे अवलोकन करण्यासाठी दुर्बिण असल्यास अधिक उत्तम निरीक्षण करता येणार आहे. अशी माहिती अमरावती येथील मराठी विज्ञान परिषद विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर या खगोल अभ्यासकांनी दिली.

### चंद्राप्रमाणे सुंदर कला

सन 1974 मध्ये पहिले मानवरहित यान 'मरिनर-10' या ग्रहावर गेले होते, तर सन 2008 मध्ये 'मेसेंजर' या यानाने बुधाचा अभ्यास केला. या ग्रहावर 'द स्पायडर' नावाचे सर्वात मोठे विवर आहे. टेलिस्कोपमधून या ग्रहाच्या चंद्राप्रमाणे सुंदर कला दिसत असल्याची माहिती हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.

### 88 दिवसात सूर्याभोवती एक चक्कर

बुध हा ग्रह सूर्यापासून जवळचा ग्रह आहे. या ग्रहाला उपग्रह नाही. हा ग्रह सूर्याला 88 दिवसात एक चक्कर मारतो म्हणजेच सर्वात वेगवान ग्रह आहे. सूर्यापासून या ग्रहाचे अंतर हे 5.8 कोटी किमी असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली.

# पं.स. मधील कर्मचाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली

## गौरखेडा कुंभी येथे घरकुल घोटाळ्याचा संशय

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.22 )** – गौरखेडा कुंभी येथील एका ग्रामस्थाने जिल्हा परिषद सिईओंकडे रितसर तक्रार करुन अचलपूर पंचायत समिती अंतर्गत गौरखेडा कुंभी येथील बनावट कागदपत्रांच्या आधारावर घरकुल घोटाळा बळकाविल्याची तक्रार केली. तसेच गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत व अचलपूर पंचायत समितीला माहिती अधिकारात कागदपत्रे मागविण्यात आली आहे. परंतू या तक्रारीमूळे अचलपूर पंचायत समितीमधील काही कर्मचाऱ्याच्या पायाखालची वाळूच सरकली आहे. याकारणाने आता थेट तक्रारकर्त्यावरच दबाव टाकण्याचा प्रकार सुरु आहे.




या कर्मचाऱ्यांकडून गावातील सामान्य नागरिकांना फुस लावून तक्रारकर्त्यांवर दबाव बनविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. तक्रारीमूळे पंचायत समिती मार्फत मिळणाऱ्या अनेक लाभाच्या योजना मधील लाभ तुम्हाला देता येणार नाही, तुम्हाला मिळणारे पैसे आता मिळणार नाहीत, अशी भीती गौरखेडा कुंभी येथील गावकऱ्यांना पंचायत समितीमधील कर्मचाऱ्यांकडून दाखविण्यात येत आहे. या तक्रारकर्त्याने आपल्या व आपल्या कुटूंबाच्या जीवाला या लोकांपासून धोका असल्याची भीतीही व्यक्त केली आहे. त्यामुळे आपल्याला संरक्षण मिळावे अशी मागणीही तक्रारकर्त्याने गटविकास अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात केली आहे. लेखी स्वरूपात व्हिसल ब्लोअर कायद्यानुसार ( भ्रष्टाचार उघड करण्या-यांना सरकारकडून मिळणाऱ्या जिविताच्या संरक्षणासाठी) संरक्षणाची मागणी केली आहे अर्ज दाखल केले. तेव्हापासून आजपर्यंत गावातील अनेक नागरिक भालेराव यांच्या घरी येऊन वादविवाद करून गेले आहेत, त्यांना विचारले तर ते सांगतात की आम्हाला पंचायत समिती अचलपूर येथील अमुक कर्मचाऱ्यांनी पाठविले आहे व तुम्ही अर्ज केल्यामुळे आमचा निधी थांबविण्यात आल्याचे सांगितले आहे. त्या कर्मचाऱ्यांची तक्रार सुद्धा आता जिल्हा परिषदे सिईओ व परतवाडा पोलीस स्टेशनला करण्याची प्रक्रीया तक्रारकर्त्यांने केली आहे.